# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १५ मार्च, २०१७ / फाल्गुन २४, १९३८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(३)** | **कृषी आणि फलोत्पादन मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५)** | **पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४६**

---

### पनवेल-सायन महामार्गावरील कामोठे खाडीवर दोन मार्गिकांना जोडण्यात आलेल्या पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१) * ७५०७३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल-सायन महामार्गावरील कामोठे खाडीवर दोन मार्गिकांना जोडण्यात आलेल्या पुलाचा जोड मजबूत नसल्याने पुलाच्या वरच्या भागावर भेगा पडल्या असून कठड्यालाही तडे गेले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गाचे रुंदीकरण करताना निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे महामार्गाला भेगा पडल्या असून दुरूस्तीअभावी संरक्षक कठड्याचीही दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही, हे खरे नाही.

प्रश्नांकित ठिकाण हे कामोठे खाडीवर नसून तळोजा खाडीवर आहे.

सदर ठिकाणी भेगा पडल्या नसून त्या नविन व जुन्या पुलांमध्ये असून Longitudinal Joint तांत्रिकदृष्ट्या स्वीकारार्ह व अपेक्षित आहे. सदर ठिकाणचा रस्ता समतल ठेऊन वाहतुकीस योग्य ठेवण्याच्या व कठडा दुरूस्तीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिरपूर (जि.यवतमाळ) या गावातील विस्थापित कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(२) * ७८७५९ श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरपूर (जि.यवतमाळ) या गावातील ९६ कुटुंबे माहे जुलै, २००५ मध्ये शिप नदीच्या महापूरात विस्थापित झाली असून या विस्थापितांचे पुनर्वसन करण्याकरीता वारंवार जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू विस्थापितांचे तातडीने पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही, हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद-जळगांव या राज्य मार्गाची झालेली दुरवस्था

**(३) * ७९६३१ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद-जळगांव राज्य मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने रस्त्याची दुरवस्था झाली असून सन २०१६ मध्ये सदर मार्गावर ३० दुर्घटना होऊन ३९ जण मृत्युमुखी पडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वडोद बाजार (जि.औरंगाबाद) पोलीस स्टेशनच्या हद्दीतील बनकिन्होला ते चिंचखेडा या दरम्यान सर्वाधिक दुर्घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मार्गावर जाहीरात करणाऱ्या कंपन्यांनी जाहिरात फलक लावून अतिक्रमण केल्यामुळे अपघातांच्या संख्येत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदर मार्गाची दुरुस्ती करण्याबाबत व मार्गावरील जाहीरात फलक हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) सद्यस्थितीत रस्त्यावरून वाहतूक सुरळीत सुरू आहे. पोलीस विभागाच्या दप्तरी असलेल्या अहवालानुसार या रस्त्यावर झालेल्या ९ अपघातात १३ प्रवासी मृत्युमूखी पडल्याची नोंद आहे. हे अपघात रस्त्याच्या दुरावस्थेमुळे झाल्याची नोंद पोलीस दप्तरी नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सद्यस्थितीत प्रश्नांकित रस्ता सुस्थितीत आहे. वेळोवेळी या रस्त्यावरील अतिक्रमणे तसेच अवैध जाहिरात फलक हटविण्यात येतात. रस्त्यावरून वाहतूक सुरळीतपणे चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गणोरे ते वीरगाव फाटा (ता.अकोले, जि.अहमदनगर) या रस्त्याचे रुंदीकरण करुन दुरुस्ती करण्याबाबत**

**(४) * ७७०५७ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गणोरे ते वीरगाव फाटा (ता.अकोले, जि.अहमदनगर) या रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मोठमोठे खड्डे पडल्यामुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली असून सदर रस्त्याचे रुंदीकरण करुन कायमची दुरुस्ती करण्याऐवजी तात्पुरती दुरुस्ती करण्यात आल्याचे दिनांक १९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता अरुंद असल्यामुळे एकाच वेळी दोन वाहने रस्त्यावरून जाणे शक्य नसल्याने या रस्त्याचे तातडीने रुंदीकरण करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याचे रुंदीकरण करून दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

गणोरे ते वीरगाव फाटा रस्ता प्राजिमा-२१ असून बागायती क्षेत्रातून जात असल्याने रस्त्यावर अवजड वाहनांची वाहतूक असते. रस्त्यावरील डांबरी पृष्ठभागावरील खड्डे माहे डिसेंबर, २०१६ पूर्वी भरण्यात आलेले आहेत. रस्त्यावरील वाहतूक सुरळीतपणे सुरू आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्नाधीन रस्त्यावरील वाहतूक वर्दळीतील वाढ लक्षात घेता रस्त्याचे रुंदीकरण करणे आवश्यक असून सदर काम मार्च, २०१७-१८ च्या अर्थसंकल्पामध्ये प्रस्तावित करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळा व सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील शासकीय जमीनींची विक्री करुन केलेला गैरव्यवहार

**(५) * ७६४२५ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळा व सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील शासकीय जमीनींची महसूल विभागातील अधिकारी व भूमाफियांनी संगनमताने विक्री करुन कोट्यवधी रुपयांच्या केलेल्या गैरव्यवहार प्रकरणी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी सुरु केलेली चौकशी पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन चौकशी समितीने त्याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालातील निष्कर्षानुसार सदर गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या अधिकारी व भूमाफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), व (४) ता.तळा जिल्हा रायगड येथील शासकीय जमिनीची गैरव्यवहाराप्रकरणी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी चौकशी करुन दिनांक ०१.०३.२०१७ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाची छाननी करून नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पीत आहे.

-----------------

## राजूर बहुला (ता.जि.नाशिक) येथे अनधिकृतरित्या गौण खनिजाचे उत्खनन होत असल्याबाबत

**(६) * ७४२५२ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुर बहुला (ता.जि.नाशिक) येथे अनधिकृतपणे गौण खनिजाचे उत्खनन करण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांकडून दंड वसूल करण्याबाबतच्या सुचना तहसिलदार व उपविभागीय अधिकारी, नाशिक यांना अप्पर जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांकडून दंड वसूल करण्याबाबत तसेच दंड वसूल करण्यास विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली असून त्यानुषंगाने संबंधितांविरूध्द दंडात्मक कारवाई करून अहवाल सादर करण्यास अप्पर जिल्हाधिकारी, नाशिक यांनी तहसीलदार, नाशिक यांना सूचना दिल्या आहेत.
(३) व (४) मौजे राजुर बहुला (ता. नाशिक) येथील मुरुमाच्या अवैध उत्खननाबाबत तहसिलदार, नाशिक यांनी दि. २८.११.२०१६ रोजी रू. १,२५,०६,२२०/- एवढ्या दंडाचे आदेश पारित केले असून, दंडाची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच संबंधितांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर आदेशाविरूध्द संबंधितांनी अप्पर जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे अपील दाखल केले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे अंबित (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील मुळा पाणलोट क्षेत्रात दरडी कोसळून झालेले नुकसान

**(७) * ७८२१० श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे अंबित (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील मुळा पाणलोट क्षेत्रातील दरडी कोसळल्याने या गावातील रस्त्यांना व घरांना मोठ्या भेगा पडल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांची व घरांची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, तद्नुसार अंबित येथील रस्त्यांची दुरुस्ती आणि ग्रामस्थांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मौजे अंबित येथील रस्त्यांची जि.प. सा.बां. उपविभाग, अकोले यांचेमार्फत तात्पुरती दुरुस्ती करून रस्ते वाहतुकीसाठी खुले करण्यात आले आहेत. अतिवृष्टीमुळे मौजे अंबित येथील ५ घरांची पडझड झाली असून नुकसानपोटी संबंधितांना रु. ११,६००/- चे अनुदान वाटप करण्यात आले आहे. तसेच दरडग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत सर्वकष धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हातकणंगले (जि.कोल्हापूर) बस स्थानक परिसरात झालेले अतिक्रमण

**(८) * ७७८७६ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) बस स्थानकासमोर मागील चार वर्षापासून सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने उड्डाणपूलाच्या नावाखाली कोणत्याही विभागाची परवानगी न घेता बेकायदेशीर खणन करुन उड्डाणपूलाचे अर्धवट बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच या बस स्थानक परिसरात व्यवसायिकांनी केलेल्या अतिक्रमणामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतुकीची कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचा परिसर अतिक्रमणापासून मुक्त करण्याकरिता तसेच बेकायदेशीर खणन करुन अर्धवट उड्डाणपूलाचे बांधकाम करणाऱ्या कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) उड्डाणपुलाचे बांधकाम अर्धवट स्थितीत आहे.

(२) अंशत: खरे आहे. या ठिकाणी रस्त्याची मुळ शासकीय हद्द मध्यापासून सर्वसाधारणपणे १० मीटर इतकी होती. प्रकल्पाच्या कामासाठी रस्त्याच्या मध्यापासून १७.५० मी. पर्यंत जागेच्या भूसंपादनाची कार्यवाही केलेली आहे. रस्त्याच्या नवीन भूसंपादन केलेल्या हद्दीनजीक काही मालकांनी जागा मोकळी करुन न दिल्याने व तेथेच व्यवसाय चालू ठेवल्याने अतिक्रमण असल्याचे दिसून येते. तथापि उड्डाणपूलाच्या अर्धवट बांधकामामुळे गर्दीच्यावेळी वाहतुकीची कोंडी होते.

(३) रस्त्याच्या मध्यापासून १७.५० मी. रुंदीने भूसंपादीत जागा रिक्त करुन घेणेची कार्यवाही करणेत येत आहे. हातकणंगले येथील उड्डाणपूल निकष, अग्रक्रम व निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भोर-आंबाडे रस्त्यावरील पोळवाडी फाटा, गोकवडी, आंबाडे (ता.भोर, जि.पुणे) येथील पुलाच्या दुरुस्तीबाबत

**(९) * ७६४५९ श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील भोर-आंबाडे रस्त्यावरील पोळवाडी फाटा, गोकवडी, आंबाडे येथील पुलावरील भराव व कठडे सन २०१६ च्या पावसात वाहून गेले असुनही सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोर-आंबाडे मार्गावर वाहतूक मोठ्या प्रमाणावर असून गोकवडी-उंबरीची ओव्हळ, आंबाडे येथील पुलाचे कठडे दोन वर्षापासून तुटलेल्या अवस्थेत आहेत तसेच या मार्गावरुन मांढरदेवीला जाणाऱ्या प्रवाशांची मंगळवारी व शुक्रवारी मोठी वर्दळ असल्याने अपघात होण्याची शक्यता निर्माण झाल्याने वाहनचालकांनी व प्रवाशांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला वारंवार कळवूनही याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पुलाची दुरुस्ती व त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

प्रश्नांकित रस्ता रा.मा.११९ चा भाग आहे. पोळवाडी फाटा येथील पाईप मोरीवरील भराव सन २०१६ च्या पावसाळ्यात क्षतिग्रस्त झाला होता. भरावाची तात्काळ दुरुस्ती करण्यात आली आहे.

गोकवाडी-आंबाडे या रस्त्यावर एका पाईप मोरी बांधण्याचे काम प्रगतीपथावर असून काम दिनांक ३० एप्रिल, २०१७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**धुळे (जि.धुळे) तालुका दुष्काळग्रस्त जाहिर करण्याबाबत**

**(१०) * ७४७२५ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे (जि.धुळे) तालुक्यातील १७० गावांची आणेवारी जाहिर करण्यात आली असून त्यात १३८ गावांची अंतिम पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी तर अत्यल्प पाऊस झाला असतानाही ६७ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा जास्त दर्शविण्यात आली असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या गावांची आणेवारी जास्त दर्शविण्यात आली आहे त्या गावांमध्ये चारा व पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तालुक्याची पाहणी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने सुधारित आणेवारी जाहिर करुन धुळे तालुका दुष्काळग्रस्त जाहिर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील रस्ते व पुलांची दुरुस्ती करण्याबाबत

**(११) * ७४०२३ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुळेवाडी (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) ही कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावरील खिंड असून तीव्र व जीवघेण्या वळणामुळे व या वळणावर असलेले लोखंडी सरंक्षक कठडे तुटल्याने अपघात होवून अनेकांना आपला जीवही गमवावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच येळवडी-शाहुवाडी (ता.शाहुवाडी) हा रस्ता तालुक्याच्या ठिकाणी जाणारा मुख्य व सोयीचा रस्ता असल्याने या रस्त्यावर वाहतुकीची नेहमी वर्दळ असते परंतु यावर्षी झालेल्या मुसळधार पावसाने सदर रस्त्यावरील संरक्षण कठडे तुटून रस्ता ही खचला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शाहुवाडीच्या (ता.शाहुवाडी) उत्तर भागातील वाड्या वस्त्यांना बाजारपेठेत व तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठीचा मुख्य मार्ग असेलेल्या कानसा नदीवरील विरळे-जांभूर पूल २५ वर्षे जुना असल्याने पुलालगतचा रस्ता खचून पूल मोडकळीस आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच शाहुवाडी-करंजोशी (ता.शाहुवाडी) या वर्दळीच्या मार्गावरील पुलावर मोठ-मोठे खड्डे पडले असून पुलाच्या संरक्षक कठड्याची दुरवस्था व पुलावर झाडाझुडपांची वाढ झाल्याने सदर पूल वाहतुकीच्या दृष्टीने धोकादायक झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावरील जिवघेणे वळण व संरक्षक कठडे, येळवडी-शाहुवाडी रस्त्यावरील संरक्षण कठडे व रस्ता, कानसा नदीवरील विरळे-जांभूर पूल, शाहुवाडी-करंजोशी मार्गावरील पूलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

सदर ठिकाणच्या तीव्र वळणावर W Beam Type क्रॅश बॅरियर्स बसविण्यात आलेले आहेत. वाहनांच्या धडकेने क्रॅश बॅरियर्स तुटल्यानंतर राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून खात्याच्या मजूरांकडून त्यांची तातडीने दुरुस्ती केली जाते. मागील वर्षभरात त्याठिकाणी अपघात झाल्याची नोंद नाही.

(२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेमार्फत संबंधित रस्ता विकसित करण्यात येत आहे. अतिवृष्टीमुळे ह्या रस्त्यावर कि.मी. १७/८०० जवळील संरक्षक भिंतीसह रस्त्याचा काही भाग खचलेला आहे. तथापि त्यामुळे वाहतूकीस कोणतीही अडचण नसून या रस्त्यावरील पूल व मो-या सुस्थितीत असल्याचे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, कोल्हापूर यांनी कळविले आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषद, कोल्हापूरकडे देखभाल व दुरुस्ती असलेल्या इतर जिल्हा मार्ग १ वरील कि.मी.३/८५० मध्ये ३० मी. लांबीचा सबमर्सिबल लहान पूल आहे. सन २०१६ च्या अतिवृष्टीमध्ये पुलाच्या पोचमार्गाचा भराव खचल्यानंतर सदर ठिकाणी तात्पुरता भराव करुन रस्ता वाहतुक योग्य केलेला आहे.

(४) हे खरे नाही.

राष्ट्रीय महामार्ग १६६ च्या ह्या भागातील खड्डे भरले असून रस्ता सुस्थितीत आहे. तसेच पूलावरील झाडे-झुडपे काढलेली असून कठडयांची वेळोवेळी दुरुस्ती करणेत आली आहे.

(५) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडून महामार्गाचे चौपदरीकरणासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीत असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात गौण खनिजाचे उत्खनन व रेतीचा उपसा होत असल्याबाबत

**(१२) * ७४४६४ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात वीटभट्ट्यांसाठी केवळ ५ परवाने देण्यात आले असताना सदर तालुक्यात ४३५ वीटभट्ट्या अनधिकृतपणे सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यात गत दोन वर्षापासून अनेक बेकायदेशीर बांधकामे झाली असून मोठ्या प्रमाणात गौणखनिज चोरी व रेतीचा उपसा करण्यात आल्यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसुल बुडला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदेशीररीत्या वीटभट्ट्या, गौणखनिज चोरी व रेतीचा उपसा करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात प्रश्नात नमूद केल्याप्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास आली नाही. माहे एप्रिल, २०१६ पासून विटभट्टीसाठी माती उत्खननाचे एकूण ३३ परवाने देण्यात आले असून, त्यापोटी एकूण रु. ४,९१,८५०/- एवढी स्वामीत्वधनाची रक्कम शासनास प्राप्त झाली आहे.

(२), (३) व (४) मुरबाड तालुक्यामध्ये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीला प्रतिबंध करण्यासाठी भरारी पथक नियुक्त करण्यात आले असून, या भरारी पथकामार्फत करण्यात आलेल्या तपासणीत एप्रिल, २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीत १३ प्रकरणांत रु.५,५५,०००/- इतका दंड वसुल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मच्छीमारांच्या बोटींसाठी वार्षिक डिझेल कोटा देण्याबाबत

**(१३) * ७९४९८ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मच्छिमारांच्या बोटींसाठी माहे जून-जुलै या महिन्यांना वगळून माहे नोव्हेंबर ते जानेवारी या कालावधीसाठी ३० टक्के, माहे फेब्रुवारी ते मार्च या कालावधीसाठी २० टक्के, माहे एप्रिल ते मे या कालावधीसाठी २० टक्के व माहे ऑगस्ट ते ऑक्टोबर या कालावधीसाठी ३० टक्के असे एकूण ३५,७००/- रूपये इतक्या रकमेचा डिझेल कोटा पुरविण्याची तरतुद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डिझेल कोटा एकावेळी दोन महिन्यांचा पुरविण्यात येत असून तो कोटा वेळेत मिळत नसल्यामुळे मच्छिमारांचे आर्थिक नुकसान होत असल्याने मच्छीमार बांधवांनी वार्षिक कोटा एकत्र देण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मच्छीमार बांधवांचे होणारे नुकसान पाहता त्यांना वार्षिक डिझेल कोटा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय. वार्षिक डिझेल कोटा चार टप्प्यात मंजूर करण्यात येत आहे हे खरे आहे. सहा सिलेंडर क्षमतेच्या नौकांना वार्षिक ३५,७०० लिटर डिझेल कोटा पुरविण्यात येतो.

(२) अंशत: खरे आहे. डिझेल कोटा विहित टक्केवारीनुसार वेळेत मंजूर करण्यात येत असल्याने आर्थिक नुकसान होत नाही. डिझेल कोटा एकत्र देण्याची करंजा मच्छिमार वि.का.सहकारी संस्था मर्या. यांनी आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे मागणी केली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती-कोढारा, नांदुरा-पुसदा, शिरला-चांदूरबाजार व अमरावती-बडनेरा (जि.अमरावती) या रस्त्यांच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१४) * ७७८१४ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती-कोढारा, नांदुरा-पुसदा, शिरला-चांदूरबाजार रोड व अमरावती-बडनेरा रोड (जि.अमरावती) या रस्त्यांच्या कामांसाठी वाटप करण्यात आलेल्या निविदांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याची तक्रार लोकप्रतीनीधींनी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांच्या ५४.७४ कोटी तसेच ८४.४४ कोटी रुपयांच्या निविदांमध्ये फक्त दोन कंपन्यांनी भाग घेतला होता परंतु निविदा प्राप्त करणाऱ्या कंपनीने ७८ टक्के वाढीव दराने निविदा सादर केली असतानाही या कंपनीला काम देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही निविदा प्रक्रिया रद्द करून नव्याने निविदा मागविण्यात याव्या अशी मागणी लोकप्रतीनिधिंनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने सदर कामांसाठी नव्याने निविदा मागविण्याबाबत तसेच सदोष निविदा पद्धत राबविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) प्रश्नांकित निविदा प्रस्ताव अनुक्रमे २.४५ टक्के व २.५५ टक्के जास्त दराचे मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती यांच्याकडून शासनास मंजुरीस्तव प्राप्त झाले आहेत. प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहेत. अद्यापि कोणत्याही निविदा देकारासंदर्भात निर्णय झालेला नाही.

(३) होय.

(४), (५) व (६) या प्रकरणी प्रश्नांकित तक्रारी संदर्भात मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती यांच्याकडून अधिक माहिती मागविण्यात आली आहे.

-----------------

## ससुन (जि.पुणे) रूग्णालयाच्या अकरा मजली नविन इमारतीत फायर अलार्म डिटेक्शन सिस्टीम बसविण्याबाबत

**(१५) * ७४४७८ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससुन सर्वोपचार रूग्णालयाच्या अकरा मजली नविन इमारतीत फायर अलार्म डिटेक्शन सिस्टीम (अग्निशमन ध्वनीसूचक यंत्रणा) बसविण्याचे काम कामाचा कुठलाही अनुभव नसलेल्या व अग्निशमन विभागाचा परवाना नसलेल्या कंपनीला देण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी स्थगिती आदेश दिल्यानंतरही या कामाचे कार्यारंभ आदेश काढण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दक्षता अधिकाऱ्यांमार्फत सदर प्रकरणाची चौकशी केली असता निविदा प्रक्रिया सदोष असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणातील सदोष निविदा पद्धत राबविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर व इतर संबंधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

निविदा सूचनेमधील अटीनुसार पात्र ठरलेल्या व निम्नतम दराच्या देकार असलेल्या कंत्राटदाराची निविदा स्विकृत करण्यात आली.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी शासन पत्र दिनांक १८/३/२०१६ अन्वये ससुन सर्वोपचार रुग्णालयाच्या नवीन इमारतीत फायर अलार्म डिटेक्शन सिस्टीम बसविण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या न्यूनतम निविदेस शासनाकडून प्रथमत: स्थगिती देण्यात आली.

तथापि सदर निविदा स्विकृती झाली असल्याने सदर निविदा रद्द केल्यास व नव्याने निविदा मागविल्यास परत १६ टक्केपेक्षा कमी दरांचा देकार आल्यास शासनास निश्चितपणे वाढीव खर्च येऊ शकतो या बाबत शासनस्तरावर साकल्याने विचार करुन सदर निविदा १६ टक्के कमी दराची असल्याने शासन हितार्थ सदर काम मंजूर निविदेनुसार संबंधित कंत्राटदाराकडून पूर्ण करुन घेणेबाबत मा.मंत्री (सा.बां.) महोदयांच्या निर्देशानुसार जाणीवपूर्वक निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दिनांक ३०/७/२०१६ रोजीच्या शासन पत्रान्वये मुख्य अभियंता (विद्‌युत), सा.बां.विभाग, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

सदर प्रकरणी चौकशी अधिका-याने दिलेल्या अहवालातील निष्कर्षात विषयांकित निविदेसंदर्भात तक्रारीत तथ्य असल्याचे दिसून येते असे अभिप्राय नमूद केले असल्याने शासनस्तरावर संबंधित अधिका-यांवर शासन नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध भागात शेतकऱ्यांचा बनावट पीक विमा दाखवून कोट्यवधी रुपयांचा केलेला गैरव्यवहार

**(१६) * ७४७०१ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या विविध भागातील १५ हजार शेतकऱ्यांचा सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये बनावट पीक विमा दाखवून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागाने केलेल्या चौकशीमध्ये केवळ एका बीड जिल्ह्यामध्येच बनावट पिक विमा दर्शवून ५८ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक अधिकाऱ्यांनी झालेल्या नुकसानीचे योग्य पंचनामे न केल्याने संगनमताने सदरहू गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विमा मिळणे सुलभ होईल व भविष्यात गैरव्यवहार होणार नाही यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) नाही.

(२) भारतीय कृषि विमा कंपनी कडून प्राप्त अहवालानुसार बीड जिल्हयातील ५ बँकांकडून त्रुटी असलेल्या विमा प्रस्तावांची नुकसान भरपाई रक्कम रु. ५९.०६ कोटी भारतीय कृषि विमा कंपनीस परत करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) केंद्र शासनाने दिनांक ८.०२.२०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या राजपत्रानुसार प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना आधार कार्ड तसेच बँक खाते क्रमांक सादर करणे अनिवार्य केले आहे. तसेच सदर योजनेअंतर्गत पीक विमा योजनेत सहभागी शेतकऱ्यांची सविस्तर माहिती वेब पोर्टलवर टाकणे संबंधित बँकांना तसेच विमा कंपनीस बंधनकारक केले असल्याने एकाच क्षेत्राचा अनेक वेळा विमा उतरविणे याबाबीस आळा बसेल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवरी (जि.गोंदिया) तहसिल कार्यालयात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१७) * ७५८९५ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरी (जि.गोंदिया) तहसिल कार्यालयातील ७ ते ८ कोटींच्या झालेल्या अपहार प्रकरणी नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने काही कनिष्ठ लिपिक व अधिकाऱ्यांना दोषी ठरवण्यात येऊन शिक्षा करण्यात आली असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या फेरचौकशी समितीने केलेल्या चौकशीनुसार तीन तहसिलदार व काही नायब तहसिलदार दोषी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी सदर अहवाल अद्यापपर्यंत विभागीय आयुक्तांना सादर न करून दोषी अधिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न करीत आहे, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणातील संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यांवर तसेच कारवाईस हेतूत: विलंब लावणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) तहसिल कार्यालय देवरी जि.गोंदिया येथील शासकीय रकमेच्या अपहाराबाबत तत्कालीन अव्वल कारकून व नायब नाझर यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन देवरी येथे दिनांक ०८.०६.२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांच्याविरुद्ध प्रथमश्रेणी न्यायालय, देवरी येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच संबधित कर्मचा-यांना जिल्हाधिकारी गोंदिया यांच्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

सदर प्रकरणाचे गांभीर्य अनुलक्षून प्रकरणाची तपासणी व आर्थिक अंकेक्षण करण्याकरिता जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदिया यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. त्याचप्रमाणे वित्त विभागाकडून तपासणी पथकाची नियुक्ती करण्यात आली होती. सदर तपासणी पथकाने सादर केलेल्या विशेष लेखा परीक्षण अहवालाच्या अनुषंगाने प्रशासकीय जबाबदारी निश्चित करण्याकरिता अप्पर जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालात सन २००५ ते २०१४ या कालावधीत कार्यरत असलेल्या तहसीलदार व इतर संबंधीत कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन जिल्हाधिकारी गोंदिया यांनी सदर अधिकारी/कर्मचारी यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासाठीचा प्रस्ताव उक्त तीनही समित्यांच्या अहवालासह विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना सादर केला आहे. त्यानुषंगाने सदर अनियमिततेस जबाबदार

अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी करण्यासाठीचा प्रस्ताव सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रुंझा (ता.केळापुर, जि.यवतमाळ) या गावाबाहेरील**
**बाह्यवळण रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(१८) * ८१३७० डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुंझा (ता.केळापुर, जि.यवतमाळ) गावातील रहदारीची वाहतूक कमी व्हावी याकरीता रुंझा गावाजवळून बायपास रस्त्याचे बांधकाम करण्यात आले असून सदर रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडून रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याचे दिनांक १५ जोनवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून देखील संबंधित अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सबंधीत विभागाच्या दोषी अधिकारी व कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे,

तथापि वाहतूक, सुरक्षीत व सुरळीत होण्याचे दृष्टीने आवश्यकतेनुसार खड्डे भरण्याचे काम करण्यात आले आहे.

(२) नाही

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## आंबोली घाट (जि.सिंधुदूर्ग) रस्त्यावर दरड कोसळल्याबाबत

**(१९) * ७८९५२ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील आंबोली घाट रस्त्यावर दिनांक २१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दरड कोसळली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घाटातील रस्ते हे ब्रिटिशकाळात तयार करण्यात आले असून वारंवार दरड कोसळल्यामुळे सदर रस्ते वाहतुकीस असुरक्षित झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्यावर दरड कोसळू नये याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

तथापि आंबोली घाटाची लांबी १५ कि.मी. आहे. या घाटरस्त्यामध्ये सन २०१० मध्ये दरड कोसळली होती. घाटामधील दरडीचा भूशास्त्रीय अभ्यास करण्यात येत आहे. या अभ्यासाचा अहवाल प्राप्त झाल्यावर आवश्यक उपाययोजना करण्याचे नियोजन आहे.

सद्यस्थितीत घाट वहातूकीसाठी सुरक्षित आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावनेर व कळमेश्वर (जि.नागपूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम देण्याबाबत

**(२०) * ७९८१० श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे फेब्रुवारी ते मार्च, २०१६ या कालावधीत वादळी वारा, अवेळी पाऊस गारपीट यामुळे शेतीपिकांचे नुकसान झालेल्या आपदग्रस्तांना मदत देण्याचे शासनाने जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यानुसार नागपूर जिल्हयातील सावनेर तालुक्यातील २९५५ शेतकऱ्यांचे २२८०.१४ हेक्टर व कळमेश्वर तालुक्यातील १३३९१ शेतकऱ्यांचे ११५०९.६० हेक्टर पिकांचे नुकसान झाले असल्यामुळे त्यांना जवळपास २१ कोटी रुपये नुकसान भरपाई म्हणून मंजूर करण्यात आली असून अद्यापही सदर शेतकऱ्यांना मदत मिळालेली नसल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, आपदग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) सावनेर व कळमेश्वर तालुक्यातील नुकसान झालेल्या पीकांकरिता एकूण रु.२०.४२ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून, त्यापैकी ९२% निधी बाधीत शेतक-यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आला आहे. उर्वरित निधी वाटपाची कार्यवाही चालू आहे. तसेच बँक खाते क्रमांक अप्राप्त असलेल्या बाधीत शेतक-यांची यादी ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालयाच्या दर्शनी भागावर प्रसिध्द करुन खातेक्रमांक सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील सरवली खाडीत अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(२१) * ७७७४२ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील सरवली खाडीवरील खारफुटी वनस्पती नामशेष करून रेती माफियांकडून रेती उपसा केला जात असल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी सतत करण्यात आलेल्या रेती उपशामुळे त्या ठिकाणच्या भौगोलिक क्षेत्राला धोका निर्माण झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार अवैध रेती उपसा करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) मौजे सरवली खाडीकिनारी सुट्टीच्या दिवशी वाळू तस्कराकडून रेतीचा उपसा अशा आशयाची बातमी एका वृत्तपत्रात दि.२३.१२.२०१६ व दि.२७.१२.२०१६ रोजी प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने, अपर मंडळ अधिकारी भिवंडी यांच्या पथकाने सदर ठिकाणी भेट दिली असता, रेती उपसामुळे खारफुटी वनस्पतीची नासधूस झाल्याचे व भौगोलिक क्षेत्राला धोका निर्माण झाल्याचे किंवा खाडीठिकाणी रेतीसाठा असल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) व (४) भिवंडी तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी पथके गठीत करण्यात आली असून, सदर पथकांमार्फत वेळोवेळी तपासणी करण्यात येते. सदर पथकांनी २०१६-१७ मध्ये भिवंडी तालुक्यातील रेती बंदरावर केलेल्या तपासणीत निदर्शनास आलेल्या अवैध रेती उत्खननाच्या १४ प्रकरणांत गुन्हे दाखल केले असून, एकूण २०४७ ब्रास रेतीसाठा, ३ सक्शन पंप व २ मोटरपंप जप्त केले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बांद्रा (मुंबई) येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागात**
**अधिकाऱ्यांनी केलेला गैरव्यवहार**

**(२२) * ७५०९८ श्री.चरण वाघमारे (तुमसर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांद्रा (मुंबई) येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र. १ व २ च्या अधिकाऱ्यांनी ८४ कामाची ३५ कोटी रुपयांची खोटी निविदा काढून प्रत्यक्षात कामे न करता मोजमाप पुस्तिकेवर शाखा अभियंता, उपअभियांता आणि कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी करून सदर कामांची देयके अदा केल्याचे सातपुते व गांगुर्डे समितीने केलेल्या चौकशीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समित्यांच्या चौकशी अहवालावर कार्यवाही करण्याबाबत दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी प्रधान सचिव, बांधकाम विभाग, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१६ रोजी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१६ रोजी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन व दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे लोकप्रतीनिधिंनी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरण निदर्शनास आल्यानंतर संबंधित दोषी अधिकाऱ्यांचा बचाव करण्यासाठी कोणतीही आर्थिक तरतूद नसतांना त्याच कामाच्या नव्याने ८५ निविदा काढून कामांची सुरुवात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

सातपुते व गांगुर्डे समितीने केलेल्या चौकशीचा या कामांशी संबंध नाही.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा पारवा (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील वाघाडी नदीवर असलेल्या शरद घाटातून अवैधरित्या रेतीचा उपसा होत असल्याबाबत

**(२३) * ८०७४३ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा पारवा (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील वाघाडी नदीवर असलेल्या शरद घाटातून रेतीचा अवैध उपसा होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैध रेती उपसा करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मौजे पारवा (ता. घाटंजी) येथील वाघाडी नदीवरील शरद घाटातून रेतीचा अवैध उपसा होत असल्याचे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले नाही. तथापि, जानेवारी, २०१७ मध्ये मौजे पारवा येथे रेतीची अवैध वाहतूक करणारी दोन वाहने पकडण्यात आली असून, त्यांच्याकडून रू. ३८,९००/- एवढी दंडाची रक्कम वसूल करून शासनजमा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**घोटी-सिन्नर (जि.नाशिक) मार्गावर असलेल्या धारणा नदीवरील पुलाच्या दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत**

**(२४) * ८००७२ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोटी-सिन्नर (जि.नाशिक) मार्गावर असलेल्या धारणा नदीवरील पुलाच्या दुरुस्तीचे काम ठेकेदार व संबंधित अधिकारी यांनी संगनमत करून निकृष्ट दर्जाचे केले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदार व त्यास सहकार्य करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

प्रश्नाधीन पुलाचे काम समाधानकारक पध्दतीने प्रगतीत आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पश्चिम द्रुतगती महामार्गाची झालेली दुरवस्था

**(२५) * ७९६७२ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत विमानतळाकडे जाणारी वाहने, मुख्य व्यापारी व प्रशासकीय केंद्रावरील वाहने, तसेच अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या वाहनांच्या सततच्या वर्दळीमुळे पश्चिम द्रुतगती महामार्गाची दुरावस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावर पूर्व द्रुतगती महामार्गाच्या तुलनेत ७५ टक्के जड वाहनांची वाहतूक होत असल्यामुळे महामार्गावर मोठे खड्डे पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महामार्गाची शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदर महामार्गाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही. तथापि, पावसाळयादरम्यान अतिवृष्टी व अवजड वाहतुकीमुळे पडलेले खड्डे वेळोवेळी भरून महामार्ग वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(३) होय.

(४) पाहणी दरम्यान रस्ता दुरूस्ती व वाहतुक वर्दळ सुरळीत ठेवण्याबाबत दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

सदर रस्त्याच्या सर्वंकष सुधारणेचे काम मंजूर असून, निधी उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील रस्त्यांच्या कामातील गैरव्यवहाराबाबत

**(२६) * ७६२८२ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील बहुतांश रस्त्यांची दुरावस्था झाली असल्याने वाहनचालकांना रस्त्यावरुन मार्गक्रमण करणे धोक्याचे झाले असल्याचे दिनांक १८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाने नायगाव-उमरी-शेळगांव-कोकलेगांव-कुंटूर-सातेगांव-तळेगांव या रस्त्यावरील तसेच उमरी (ज) ते आष्टी या रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम एका कंत्राटदाराला दिले असून सदर रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी कंत्राटदाराकडून मातीमिश्रित चुरीचा उपयोग होत असून डांबराचे प्रमाण कमी असल्यामुळे या कामामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याने या रस्त्यावर केलेला कोट्यवधीचा खर्च वाया जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नांदेड (जि.नांदेड) शहराला पश्चिमेकडून बायपास देण्यासाठी तयार करण्यात येत असलेला हासापूर-नसरतपूर वळण रस्त्याची निर्मिती मूळ नकाशाप्रमाणे न करता नव्या मार्गाने रस्ता टाकून धार्मिकस्थळांना बाधा पोहचत असल्याची तक्रार गत दोन वर्षापासून नागरीक प्रशासनाकडे करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर जिल्ह्यातील उक्त रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत तसेच प्रश्न भाग २ मधील रस्त्याच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर विषयाबाबत नागरीकांचे तक्रार अर्ज दि.१८/०७/१६, ०३/१०/१६ व १५/१०/१६ अन्वये प्राप्त आहेत. तथापी, रस्त्याचे बांधकाम मंजुर आखणी नकाशा प्रमाणे करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील हिरण्यकेशी नदीवर पूल बांधण्याबाबत**

**(२७) * ७८६९१ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील मौजे हेब्बाळ कसबा नूल येथील शेतकऱ्यांना हिरण्यकेशी नदी ओलांडून जाण्यास पूल नसल्याने ग्रामस्थांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजे नौकुड (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) या गावात जा-ये करण्यासाठी असलेल्या तीनही मुख्य रस्त्यांची दुरावस्था झालेली असल्याने ग्रामस्थांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने हिरण्यकेशी नदीवर पुल बांधण्याबाबत व रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, अंशत: खरे आहे.

गडहिंग्लज (जि. कोल्हापूर) तालुक्यातील मौजे हेब्बाळ कसबा नूल ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचा बंधारा अस्तित्वात आहे. अतिवृष्टीत सदर बंधाऱ्यावरुन पाणी वाहत असल्यामुळे वाहतुक खंडीत होते.

(२) होय,

मुख्य तीनही रस्ते जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग, कोल्हापूर यांचे अखत्यारित येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) हिरण्यकेशी नदीवरील पूल व रस्त्यांची दुरुस्ती कामे करणे आवश्यक आहे. ही कामे मंजूरी, निधी निकष व प्राधान्य क्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी (जि.ठाणे) येथील एस.एस.एस. केबल कंपनीविरुद्ध कारवाई करण्याबाबत**

**(२८) * ७९७०९ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) शहर व तालुक्यामधील एस.एस.एस. केबल कंपनीने शासकीय नियमांचे उल्लंघन करुन अनेक वर्षापासून शासनाचा मनोरंजन कर बुडविला असून याबाबत चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी-भिवंडी पूर्व यांनी महसूल राज्यमंत्री यांच्याकडे निवेदनाव्दारे दिनांक १४ मार्च, २०१६ व दिनांक १८ मे, २०१६ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस.एस.एस. केबल कंपनीने अनेक वर्षापासून मनोरंजन कर बुडविला असूनही महसूल विभागांकडून एस.एस.एस. केबल कंपनीविरुध्द कारवाई करण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर केबल कंपनीविरुध्द तसेच सदर केबल कंपनीविरुध्द कारवाई करण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी या अनुषंगाने दि.११ मार्च, २०१६ व दि.१६ मे, २०१६ ची दोन निवेदने शासनास सादर केली आहेत.

उपरोक्त निवेदनांमध्ये नमूद करण्यात आलेल्या त्यांच्या दि.१३ मार्च, २०१५ च्या पत्रात केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रस्तुत विषयी जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली असता, भिवंडी, जि. ठाणे येथील एस.एस.एस. केबल कंपनी या बहुविध यंत्रणा परिचालक (M.S.O.) कंपनीच्या अंर्तगत येणाऱ्या विविध स्थानिक केबल परिचालकांद्वारे (L.C.O.) घोषित केबल जोडण्यांपोटी देय असलेल्या करमणूक शुल्काचा भरणा महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील तरतुदींन्वये शासनाकडे वेळोवेळी करण्यात येत असल्याचे चौकशीअंती आढळून आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील पिंपरखेड-भागडी, शिक्रापूर ते मलठण, कानसे ते शिनोली तसेच कळंब ते महाळुंगे या रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(२९) * ७७८३७ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील पिंपरखेड-भागडी, शिक्रापूर ते मलठण, कानसे ते शिनोली तसेच कळंब ते महाळुंगे या रस्त्यांची अतिशय दुरवस्था झाली असून रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले आहेत त्याच बरोबर या रस्त्याच्या साईड पट्टयाही करण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे या रस्त्यांवर वारंवार लहान-मोठे अपघात होत असल्याने तेथील जनतेने सार्वजनिक बांधकाम विभाग, जि.पुणे यांचेकडे वारंवार तक्रार करुन सुध्दा अद्‌याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक १९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवदेनही दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनाच्या अनुंगाने या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, अंशत: खरे आहे.

प्रश्नांकित रस्त्यांपैकी शिक्रापूर-मलठण,कळंब म्हाळुंगे हे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित आहेत. पिंपरखेड-भांगडी, कानसे ते शिनोली हे रस्ते जिल्हा परिषद, पुणे यांच्या अखत्यारित आहेत. या रस्त्यांच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे डांबरमिश्रित खडीने भरुन रस्ते वहातूकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत.

(२) होय,

(३) व (४) प्रश्नांकित रस्त्यांच्या लांबीपैकी काही क्षतिग्रस्त लांबीत मजबूतीकरण, डांबरीकरण व इतर आवश्यक कामे करणे आवश्यक आहे. ही कामे मंजूरी, निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## कुलाबा (मुंबई) येथील 'ससून डॉक' बंदरात पर्ससीन नेटवर बंदी घातलेली असतानाही बेकायदा मासेमारी सुरु असल्याबाबत

**(३०) * ७३९१६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने पर्ससीन नेटवर बंदी घातलेली असतानाही कुलाबा (मुंबई) येथील 'ससून डॉक' बंदरात अद्यापही मोठया प्रमाणात बेकायदा पर्ससीन नेटद्वारे मासेमारी व्यवसाय सुरु असल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रती नौका एक लाख रूपये प्रमाणे दरमहा सात कोटी रूपये घेऊन शासनाचे अधिकारी संगनमताने पर्ससीन नौकांना कोणताही परवाना नसताना मासेमारीसाठी परवानगी देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्ससीन नेटच्या बेकायदा मासेमारीमुळे स्थानिक पारंपारिक मच्छीमारांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, तदनुसार पर्ससीन नेट धारक मच्छिमारांवर व त्यांच्याकडून लाच घेणाऱ्या अधिकाऱ्यांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे अंशत: खरे आहे. पर्ससीन नेटवर बंदी नसून निर्बंध आहेत.

(२) व (३) नाही, हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्ह्यातील भीमा नदी पात्रात होत असलेल्या वाळू उपशाबाबत**

**(३१) * ७३९८८ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील भीमा नदी पात्रातील वाळूच्या प्रचंड उपशामुळे पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्यावर विपरीत परिणाम होत असल्याबाबतची तक्रार लोकप्रतिनिधी व स्थानिक ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, सोलापूर तसेच पाटबंधारे विभाग, सोलापूर यांच्याकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या वाळू उपशामुळे त्या ठिकाणचा वाळूचा नैसर्गिक साठा समाप्त होऊन अनेकांच्या शेतजमिनीला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे म्हैसलगे-देवीकवठा, ता. अक्कलकोट या वाळूगटातून बोटीने वाळू उपसा केल्यास पाणी दूषीत होवून नागरीकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते अशा आशयाची तक्रार प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या स्तरावर चौकशी सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्ह्यातील धरमतर खाडीतील जेएसडब्ल्यू कंपनीच्या होणाऱ्या जलवाहतुकीमुळे भातशेतीचे होत असलेले नुकसान**

**(३२) * ७५४०७ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथील जेएसडब्ल्यू कंपनीला लागणाऱ्या कच्च्या मालाची वाहतूक धरमतर खाडीतून चालू असून मोठमोठया जहाजांच्या सततच्या जलवाहतुकीमुळे समुद्रात प्रचंड लाटा निर्माण होऊन शेतीचे बाहय काठ फुटून समुद्राचे खारे पाणी शेतात जावून भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांनी दिनांक २८ डिसेंबर २०१६ रोजी वा त्या सुमारास आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पेण तालुक्यातील जेएसडब्ल्यू कंपनीसाठी कच्च्या मालाची वाहतूक करणाऱ्या जहाजांच्या जलवाहतूकीमुळे निर्माण होणाऱ्या दुहेरी लाटांमुळे धरमतर खाडीच्या दोन्ही काठावरील व खारभूमी योजनांच्या बांधाला धोका पोहोचून बांधाची धूप होत असल्याचे कार्यकारी अभियंता खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण यांनी केलेल्या चौकशीत निदर्शनास आले आहे.

(३) सदर नुकसान नैसर्गिक आपत्ती अंतर्गत विहित निकषांमध्ये अंतर्भूत नसल्याने नैसर्गिक आपत्ती अंतर्गत मदत अनुज्ञेय नाही. तथापि, सदर प्रकरणी खारभुमी विभागामार्फत धरमतर खाडीवरील दोन्ही काठावरील खारभुमी योजनांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती कामे उपलब्ध निधीतून करुन योजनांचे क्षेत्र संरक्षित केले आहे. तसेच, धरमतर खाडीलगत असलेल्या एकूण २५०० मीटर पेक्षा जास्त अंतराच्या बांधाची दुरुस्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**टोळ फाटा (जि.रत्नागिरी) येथील काळ नदीवरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३३) * ७९१५५ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड, मंडणगड व म्हसळा (जि.रत्नागिरी) तालुक्याला जोडणाऱ्या टोळ-आंबेत रस्त्यावरील टोळ फाटा येथे असलेल्या काळ नदीवरील पुलाचे कठडे तुटले असून पुलावर खड्डे पडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुलाच्या शेजारीच रेतीचा मोठ्या प्रमाणावर उपसा होत असल्याने पुलाला धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर पुलाची दुरुस्ती करण्याबाबत तसेच पुलाच्या दुरुस्तीस विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

पूलाचे कठडे काही ठिकाणी क्षतिग्रस्त झाले आहेत. पूलाच्या पृष्ठभागावर पडलेले खड्डे आता डांबरमिश्रित खडीने भरले आहेत. पूलावरुन वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.

(२) नाही.

(३), (४) व (५) पूलाची तज्ञ सल्लागाराकडून तपासणी करण्याचे काम प्रगतीत आहे. या तपासणीचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्यातील निष्कर्षानुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**मंडणगड-पालवणी-आवाशी (जि.रत्नागिरी) फाट्यापर्यंतच्या रस्त्यांचे नुतनीकरण व डांबरीकरण करण्याबाबत**

**(३४) * ८१०१८ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड-पालवणी-आवाशी फाट्यापर्यंतचा रस्ता (ता.मंडणगड व दापोली, जि.रत्नागिरी) संपूर्ण डांबरीकरण करणे तसेच आंजर्ले ते दापोली या रस्त्यावरील आंजर्ले खाडी पुल ते नवानगर या वळण रस्त्याचे नुतनीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक असल्याने रस्त्यांचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्यांची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) प्रश्नाकिंत रस्त्यांच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्यात आले असून वाहतूक सुरळीत सुरू आहे.

या रस्त्यांच्या लांबीपैकी काही क्षतिग्रस्त लांबीमध्ये मजबूतीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे. ही कामे मंजूरी निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## गडचिरोली जिल्हयातील तुर पिकांवर मर रोगाचा झालेला प्रादुर्भाव

**(३५) * ७९८५५ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयातील तुर पिकांवर मोठ्या प्रमाणावर मर रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतातील तुरीचे उभे पीक वाळत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जिल्हयातील तुर पिकांची पाहणी शासनाने केली आहे काय,
(३) असल्यास, तद्नुसार शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) काही गावांमध्ये अत्यल्प प्रमाणात मर रोग आढळून आलेला आहे. तसेच गडचिरोली आरमोरी, वडसा, कुरखेडा तालुक्यात तुर पिकावर पाने गुंडाळणाऱ्या अळीचा व शेंगा पोखरणाऱ्या अळीचा तुरळक प्रमाणात प्रादुर्भाव दिसून आला आहे.
(२) पिकावरील किडरोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) अंतर्गत पिकांचे नियमित सर्वेक्षण करण्यात आले आहे.
(३) वेळीच उपाययोजना करुन रोगावर नियंत्रण ठेवण्यात आल्याने नुकसान अत्यल्प प्रमाणात झाले. त्यामुळे नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेवाळ (जि.हिंगोली) येथील तलाठी भवनाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याबाबत

**(३६) * ८०१५२ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेवाळ (जि.हिंगोली) येथे बांधण्यात आलेल्या तलाठी भवनाचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून ही इमारत हस्तांतरीत करण्यापूर्वीच मोडकळीस येवून धोकादायक झालेली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने इमारतीचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. सद्य:स्थितीत तलाठी कार्यालयाची इमारत सुस्थितीत असून वापरात आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे सापिर्ली-सिमेचीवाडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील साकव जीर्ण झाल्याबाबत**

**(३७) * ७४१८५ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सापिर्ली-सिमेचीवाडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) या वाडीकडे जाण्याकरिता नदीवर असलेला जुना साकव अत्यंत जीर्ण झाला असल्यामुळे ग्रामस्थांना जाणे येणे करण्यास धोक्याचा झाला असून पावसाळ्यात नदीला येणाऱ्या पुरामुळे ग्रामस्थांचा इतर गावांशी संपर्क तुटतो, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोकादायक साकवाच्या जागी नवीन पूल बांधण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी पासून सातत्याने करून देखील शासनाकडून अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त ठिकाणी पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२), (३), (४) व (५) प्रश्नाधीन पूल हा ग्रामीण मार्ग-१०५ या जिल्हास्तरीय रस्त्यावरील असून सदरचा रस्ता देखभाल व दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचे अखत्यारित आहे. प्रश्नाधीन पूलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

**उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील क्र. २६२ व २५९ या राज्य महामार्गाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३८) * ७८५९२ श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील राज्य महामार्ग क्र. २५९ व २६२ या दोन्ही राज्यमार्गाची ३० वर्षापूर्वी निर्मिती करण्यात आली असून सदर राज्य मार्गावर सर्वत्र खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महामार्गांची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने राज्य महामार्ग क्र. २५९ व २६२ ची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही,
प्रश्नाकित रस्त्याच्या डांबरी पृष्ठ भागावर पडलेले खड्डे भरण्यात आले आहे. रस्त्यावरुन वाहतुक सुरळीत सुरु आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील व्यावसायीकांनी अवैध उत्खननाचा दंड न भरल्याबाबत

**(३९) * ७७५३९ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात मोठा प्रमाणात अवैध उत्खनन केल्या प्रकरणी ७५ व्यावसायिकांवर १ कोटी, २० लक्ष रुपयांचा दंड सन २०१३ मध्ये आकारण्यात आला असून अद्यापही दंडाची रक्कम वसुल करण्यात आलेली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर व्यावसायिकांकडून दंडाची रक्कम वसुल करण्याबाबत तसेच दंडाची रक्कम वसुल करण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) प्रश्नात नमूद वस्तुस्थिती नसून सावंतवाडी (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यात सन २०१३ मध्ये अवैध उत्खननाच्या ७५ प्रकरणांत रू. ३३,८४,७५४/- एवढा दंड आकारण्यात आला आहे. उक्त दंडाच्या रकमेपैकी ६५ प्रकरणांत रू. १६,१७,२६०/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली असून, १ प्रकरण अपर जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांच्या न्यायालयात सुनावणीकरीता प्रलंबित असून, सदर प्रकरणात आव्हानित आदेशातील रक्कमेच्या ५० टक्के रक्कम रू. ५,०८,४२२/- याचा भरणा करण्यात आला आहे. उर्वरीत ९ प्रकरणांत रू.७,५०,६५०/- एवढ्या रकमेच्या दंडाच्या वसुलीची कार्यवाही सुरू असून, संबंधितांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यात परवानगीपेक्षा अधिक वाळूची वाहतूक होत असल्याबाबत**

**(४०) * ७८९५४ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील वाळू पट्टयातील वाळूसाठी दिलेल्या पासापेक्षा अधिक वाळू भरून वाहतूक केली जात असल्याचे स्थानिक जनतेनी तहसिलदार कुडाळ यांच्या निदर्शनास आणून देऊन सुद्धा संबंधित वाळू माफियांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर व कारवाई करण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) अशी बाब तहसीलदार कुडाळ यांच्या निदर्शनास आणून दिल्याचे दिसून येत नाही. तथापि, वाळूपट्टयातील वाळू वाहतूक परिमाणापेक्षा अधिक निर्यात होणार नाही याकडे लक्ष ठेवण्याबद्दल व

नियमांचे उल्लंघन करून वाळूची वाहतूक होत असल्याचे आढळल्यास नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्याबद्दल तहसीलदार कुडाळ यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वाडा ते मनोर (जि.पालघर) या मार्गासाठी ग्रामपंचायतीचे बनावट दाखले दाखवून जमिनी संपादीत केल्याबाबत**

**(४१) * ७९७४० श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा ते मनोर (जि.पालघर) मार्गाची बांधणी करणाऱ्या सुप्रीम समुहातल्या सुप्रीम मनोर, वाडा, भिवंडी इन्फ्रा प्रा.लि. या कंपनीला वडपे जंक्शन ते विश्वभारती फाटा या बाह्य वळण रस्त्याच्या चौपदरीकरणाचे कंत्राट बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वावर देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामासाठी लागणारी जमीन संपादित करण्यासाठी कंपनीने नियुक्त केलेल्या व्यक्तींनी स्थानिक लोकांशी संगनमत करुन वनविभाग व महसूल विभागाच्या राखीव ठेवलेल्या जमिनीवर कब्जेदार उभे करुन व ग्रामपंचायतीचे बनावट दाखले दाखवून जमिनी हस्तगत केल्या आहेत तसेच कंपनीने त्यांना दिलेल्या अधिकारांचा दुरुपयोग करुन कंपनीची करोडो रुपयांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे कंपनीने दिलेले नुकसान भरपाईचे धनादेश बँकेचे व्यवस्थापक आणि इतर कर्मचाऱ्यांच्या संगनमताने संबंधित बँकेचा अस्थायी कर्मचारी श्री. मोहन पाटील याच्या व त्याच्या नातेवाईकांच्या खात्यात जमा झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व त्यानुसार दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) प्रकल्पाकरिता लागणारे भूसंपादन करण्याची जबाबदारी पूर्णत: उद्योजकाची असून ही कंपनीची अंतर्गत बाब आहे. चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील घोड नदीवरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(४२) * ७८४०६ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील पश्चिम आदिवासी पट्टयातील गंगापूर येथील घोड नदीवरील पुलाच्या दोन्ही बाजूचे संरक्षक लोखंडी कठडे मोडकळीस आल्याने व पुलावर मोठमोठे खड्डे पडल्याने विद्यार्थ्यांना व प्रवाशांना जाणे येणेकरीता धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूल आजुबाजूच्या १६ गावांना व वाडया-वस्त्यांना जोडणारा असल्याने त्या परिसरातील नागरीकांनी पुलाची दुरुस्ती करण्याबाबत मागणी केली असून यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, पाहणीच्या अनुषंगाने सदर पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे. सदर ठिकाणी कोल्हापूर पद्धतीचा बंधारा वजा पूल असून त्याचे संरक्षक कठडे अंशत: तटलेले आहेत.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रस्तुत प्रकरणी दि. ३१ जानेवारी, २०१७ रोजी मा. मंत्री सार्वजनिक बांधकाम यांना निवेदन दिलेले आहे.

(३) व (४) संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी प्रक्षेत्रावर पाहणी केली असून कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यावरील संरक्षक लोखंडी कठडे अंशत: काही ठिकाणी तुटलेले असून रस्त्यावर किरकोळ स्वरुपात खड्डे पडलेले आहेत, असे निदर्शनास आले. सदर को. प. बंधारा पाणीसाठा निर्मितीसाठी असून त्यावरील रस्त्याचा वापर अवजड वाहनांच्या दळणवळणासाठी अनुज्ञेय नाही. निधीचे उपलब्धतेनुसार बंधाऱ्याचे नियत देखभाल व दुरुस्तीची कामे करण्याचे महामंडळ स्तरावर नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पेण ते बोईसर व्हाया वसई मार्गे रो-रो सेवा सुरू करण्याबाबत**

**(४३) * ७३९१७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने नवी मुंबई, ठाणे, घोडबंदर रोड, भिवंडी व वसई या भागातील महामार्गावरील अवजड मालाच्या वाहतुकीमुळे होणारी वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी पेण ते बोईसर व्हाया वसई मार्गे रो-रो सेवा सुरू करण्याचा निर्णय दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रो-रो सेवेचे स्वरूप काय आहे व यामध्ये शासनास एकूण किती महसूली उत्पन्न प्राप्त होणार आहे,
(३) असल्यास, सदर रो-रो सेवा तातडीने सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

परंतु दि. ५.१.२०१७ रोजी पश्चिम रेल्वेने पेण ते बोईसर व्हाया वसई अशी रो-रो सेवा चालू करणेसंदर्भात चाचणी घेतली. तथापि ही बाब राज्य शासनाच्या अखत्यारितील नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शेगाव (जि.गडचिरोली) परिसरातील इरई नदी तसेच आष्टा व पारोधी घाटावरुन अवैधरित्या वाळूची तस्करी होत असल्याबाबत**

**(४४) * ७९८५७ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगाव (जि.गडचिरोली) परिसरातील इरई नदी तसेच आष्टा व पारोधी घाटावर मोठ्या प्रमाणात वाळूची तस्करी होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महसूल विभागाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वाळू तस्करी करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) प्रश्नात नमूद इरई नदी व वाळूघाट हे गडचिरोली जिल्ह्यात नसून, भद्रावती तालुका (जि.चंद्रपूर) येथे आहे.

भद्रावती तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी भरारी पथके गठीत करण्यात आली आहेत. सदर भरारी पथकाने जानेवारी, २०१७ मध्ये केलेल्या तपासणीत इरई नदीलगतच्या नाल्यातून वाळूच्या अवैध उत्खननाची व वाहतूकीची ४ प्रकरणे निदर्शनास आली. त्यानुसार संबंधितांकडून रुपये ३१,६००/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे.

मौजे आष्टा व पारोधी हे वाळूगट इरई नदीवर असून, आष्टा वाळूगट सन २०१६-१७ या वर्षात लिलावात गेला असून, संबंधित लिलावधारकामार्फत वाळूचे उत्खनन सुरू आहे. पारोधी हा वाळूगट लिलावात गेला नसून, सदर वाळूगटातून वाळूचे अवैध उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुरबाड-शहापूर (जि.ठाणे) या दोन तालुक्यांना जोडणारा काळू नदीवरील पूल बांधण्याबाबत

**(४५) * ८०१२२ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड-शहापूर (जि.ठाणे) या दोन तालुक्यांना जोडणारा काळू नदीवरील पूल मोडकळीस आल्यामुळे तेथील वाहतूक गत तीन महिन्यांपासून बंद असल्याने स्थानिक नागरीकांना प्रवास करताना अडचणी निर्माण होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पूल बांधून ५० वर्षाहून अधिक कालावधी झाला असतांनाही कार्यकारी अभियंता व उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शहापूर यांच्या बेजबाबदार कामामुळे व दुर्लक्षामुळे सदरहू पूल गत तीन महिन्यांपासून वाहतूकीस बंद करण्यात आल्याचे निदर्शानास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर पूलाचे बांधकाम करण्याबाबत तसेच सदर पुलाच्या बांधकामास जाणीवपूर्वक विलंब लावणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

प्रश्नांकीत पूल वाडा-शहापूर-मुरबाड कर्जत चौक या रा.मा. ७९ वर कि.मी. ६३/०० मध्ये आहे. पूल १६०मी. लांबीचा आहे. या पूलाची पाहणी क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये केली तेव्हा पूलाच्या गाळा क्र. २ मधील बॉक्स गर्डर क्षतिग्रस्त झाल्याचे दिसून आले. पुलावरुन वाहतूक चालू ठेवणे धोकादायक असल्याने दि. १९/१०/२०१६ पासून पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. पूलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले असून त्यातील निष्कर्षानुसार पूलाची दुरुस्ती करण्याचे नियोजन आहे.

प्रश्नांकीत पूल व रस्ता केंद्र शासनाने राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ अ म्हणुन घोषित केला आहे. त्यामुळे या पूलाच्या दुरुस्तीचे काम केंद्रशासनामार्फत होणे अपेक्षित आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**केसनंद (ता.हवेली, जि.पुणे) येथे आयोजित केलेल्या सनबर्न म्युझिक फेस्टिव्हलचे परसेप्ट कंपनीने मुद्रांक शुल्क न भरल्याबाबत**

**(४६) * ७४२३८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केसनंद (ता.हवेली, जि.पुणे) येथे दिनांक २८ ते ३१ डिसेंबर, २०१६ याकालावधीतील सनबर्न म्युझिक फेस्टिव्हलसाठी ४२ लाख ९२ हजार ८५ रुपये मुद्रांक शुल्क परसेप्ट कंपनीने भरणे आवश्यक असतांना केवळ १२ हजार ५०० रुपये भरून शासनाचा महसूल बुडविला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परसेप्ट कंपनीने, 'सनबर्न' कार्यक्रम आयोजित करण्यासाठी, वन, वाहतूक तसेच वाळू उत्खनन करण्यासाठी महसूल विभागाची परवानगी घेतली नसल्याचे जिल्हाधिकारी यांनी दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास केलेल्या चौकशीत आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना नसल्याने सनबर्न म्युझिक फेस्टिव्हलचा मंच आगीने पेट घेऊन जळून खाक झाल्याची घटना माहे जानेवारी, २०१७ मध्ये घडली असून जर त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात लोक उपस्थित असती तर या घटनेने मोठ्याप्रमाणात जीवित हानी झाली असती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनाचा मुद्रांक शुल्क बुडविणाऱ्या व कोणतीही परवानगी न घेता कार्यक्रमांचे आयोजन करणाऱ्या आयोजकांवर व त्यांना मदत करणाऱ्या संबंधितावंर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) उक्त कार्यक्रमाकरिता मुख्य अग्निशामक अधिकारी, पुणे महानगरपालिका यांनी ना-हरकत प्रमाणपत्र दिले होते आणि कार्यक्रमाचे दरम्यान कार्यक्रमाचे ठिकाणी अग्निशामन व्यवस्था ठेवण्यात आली होती. तथापि, सदरचा कार्यक्रम संपल्यानंतर दुस-या दिवशी दि.०२/०१/२०१७ रोजी सेट उतरवताना आग लागल्याची घटना घडली. त्यावेळी आग तातडीने आटोक्यात आणल्यामुळे कुठल्याही प्रकारची जिवितहानी झाली नाही.

(४) उक्त कार्यक्रमाकरिता मौजे केसनंद, ता.हवेली, जि.पुणे येथील गट नं. ५९ मधील ५ हेक्टर ४० आर व गट नं. ६० मधील १५ हेक्टर ५२ आर क्षेत्र व त्यावरील २५०० चौ.फूट बांधकाम या एकत्रित क्षेत्राकरिता नोंदविण्यात आलेला लिव्ह अँड लायसेन्स हा दस्त महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अनुच्छेद ३६ (भाडेपट्टा) च्या तरतूदीखाली येत असल्याने उक्त दस्तास देय असलेले मुद्रांक शुल्क रू.४२,७९,५८५/- व नोंदणी अधिनियमानुसार देय असलेली नोंदणी फी रू.२९,०००/- कमी भरल्याचे निदर्शनास आल्याने उक्त रक्कम वसूलीची कार्यवाही सुरू केली आहे. अनधिकृत गौण खनिज उत्खननाबाबत रू. ६०,५२,३८३/- दंडाचा आदेश पारित करण्यात आला आहे. बेकायदा २५-३० वृक्षांची तोड केल्याप्रकरणी वन विभागामार्फत संबंधितांविरुध्द ३ वनगुन्हे नोंदविले असून वनक्षेत्रामध्ये बेकायदा खोदकाम प्रकरणी ४ वाहने जप्त केली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.